(7 283/55

Read & Recd

# स न्मि त्र मं ड ळ गो रे गां व

## घ ट ना

संस्थेचे नांव व पत्ता

१) संस्थेचे नांव - सन्मित्र मंडळ, गोरेगांव असे राहिल.

२) संस्थेचा पत्ता - रमा निवास, गोपटेवाडी, आरेरोड, गोरेगांव पूर्व, मुंबई ४४

३) अुद्देश :- अभिनव व अद्यावत पध्दतीने शिक्षण प्रसार करणे व समाजाच्या सांस्कृतिक अुन्नतिसाठी प्रयत्न करणे.

४) सभासद व - विशेष आश्रयदाते, आश्रयदाते, आजीव सभासद आणि सर्वसाधारण सभासद असे संस्थेच्या सभासदांचे चार प्रकार राहतील.

अ) संस्थेला दोन हजार किंवा त्यापेक्षा जास्त रुपये अथवा त्या किंमतीची मालमत्ता देणाऱ्यांना विशेष आश्रयदाते

आ) अडीचशे ते दोनहजार रुपयांपर्यंत रक्कम किंवा त्या किंमतीची मालमत्ता देणाऱ्यांना आश्रयदाते

अि) अेकशेअेक ते अडीचशे रुपयांपर्यंत रक्कम देणाऱ्यांना आजीव सभासद म्हणून संबोधिले जाअील

अी) तीन किंवा अधिक रुपये वार्षिक वर्गणी देणाऱ्यांना सर्वसाधारण सभासद म्हणून संबोधिले जाअील.

वरील अ, आ, अि, अी या श्रेणींतील व्यक्तींना सभासद म्हणून मान्यता देण्याचा वा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहिल. अशा प्रकारचे अर्ज नाकारतांना त्यांची कारणे देण्याचे बंधन कार्यकारिणीवर नाही.

५) संस्थेच्या सभासदांना सर्वसाधारण मंडळाच्या (General Body) सभेला हजर राहून प्रत्येकी अेक मत देण्याचा अधिकार राहिल. (स्वतःचे प्रतिनिधि पाठविता येणार नाहीत.)

संस्थेच्या सभासदांना कार्यकारी मंडळाचे सभासद निवडण्याचा किंवा सभासद म्हणून निवडून येण्याचा अधिकार राहिल.

(ल) ज्या सभासदांनी सतत दोन वर्षे मंडळाची वर्गणी थकविली असेल त्यांचे सभासदत्व रद्द झाल्याचे समजण्यांत येईल (अ) वरील (ल) येथील संस्थेच्या नियमांचा भंग करणे वा अन्य कारणांसाठी कुठल्याहि श्रेणीतील सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार सर्वसाधारण मंडळास राहिल.

मात्र वरील निर्णय घेण्यापूर्वी अशा सभासदास आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधि सर्वसाधारण सभा देईल.

सर्वसाधारण मंडळाच्या सामान्य सभेपूर्वी १२ (बारा) दिवस अगोदर आपली कोणतीहि सूचना सभेपुढे विचारासाठी कार्यवाहाकडे पाठविण्याचा अधिकार प्रत्येक सभासदास राहील.

निधि

६) संस्थेचा निधि पुढीलप्रमाणे जमविण्यांत येईल.

अ) विशेष आश्रयदाते, आश्रयदाते आणि आजीव सभासदांकडून मिळालेल्या रकमा

आ) सर्वसाधारण सभासदांकडून मिळणारी वार्षिक वर्गणी

इ) सभासदांकडून व हितचिंतकांकडून मिळणाऱ्या देणग्या आणि अन्य किरकोळ रकमा

ई) शाळेचे फीचे उत्पन्न आणि तसेच संस्थेच्या विविध कार्यातून होणारे उत्पन्न

उ) सरकारी खात्यांतून किंवा स्थानिक संस्थांकडून मदत म्हणून मिळणाऱ्या रकमा

७) संस्थेच्या निधीचा विनियोग संस्थेच्या उद्देशपूर्तिसाठींच केला जाईल. संस्थेचा निधि सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी अध्यक्ष, कार्यवाह, व खजिनदार या तिघांवर राहिल. त्या प्रीत्यर्थ त्यांना कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या बँकेत चालू किंवा किंवा खाते उघडण्याचा अधिकार राहिल. अशा बँकेमध्ये ठेवलेल्या रकमा मंडळाच्या कामासाठी परत काढण्याचा अधिकार या तिघांवर राहिल. अशा तऱ्हेने रकमा परत घेतांना वरील तिघांपैकी दोघांच्या सह्यांची जरूर असेल. मात्र त्या दोघांत खजिनदारांची सही असेल.

सर्वसाधारण मंडळ .......

सर्वसाधारण मंडळ
-------------

(८) संस्थेच्या सर्वसाधारण मंडळामध्ये 'विशेष आश्रयदाते', 'आश्रयदाते', 'आजीव सभासद' व 'सर्वसाधारण सभासद' ह्यांचा समावेश होईल.

९) सर्वसाधारण मंडळ हें सर्वाधिकारी राहिल. कार्यवाह

१०) सर्वसाधारण मंडळाची सभा अध्यक्षांचे सल्ल्याने / बोलावतील. सर्वसाधारण मंडळाची सभा वर्षांतून कमीत कमी अेकदां तरी बोलाविली जाईल.

११) सर्वसाधारण मंडळाच्या सामान्य सभेपूर्वी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर सर्व सभासदांना त्यांच्या माहिती असलेल्या पत्त्यावर पोस्टल सर्टिफिकेट पद्धतीने अथवा प्रत्यक्ष निमंत्रण पाठविलें पाहिजे व सभेंत होणाऱ्या कामकाजाचा तपशील वरील पद्धतीनेच कमीत कमी सात दिवस अगोदर सभासदांकडे पाठविला पाहिजे. सर्वसाधारण मंडळाच्या खास सभेचे निमंत्रण वरील पद्धतीनेच सभेपूर्वी कमीत कमी सात दिवस अगोदर सभेच्या कामकाजाच्या तपशिलासह (संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल आणि हिशेब तपासनिसांनी तपासलेला जमाखर्च व ताळेबंद वित्यादि) पाठविले पाहिजे.

१२) सर्वसाधारण मंडळाची खास सभा बोलावण्यासाठी दहा सभासदांनी लेखी मागणी केल्यास अशी सभा अेक महिन्याचे अंत कार्यवाहास बोलवावी लागेल.

१३) सर्वसाधारण मंडळाच्या सभेसाठी अेकंदर सभासदांच्या $\frac{१}{१०}$ किंवा पंधरा यांपैकी अधिक असेल ती संख्या गणसंख्या ('कोरम') म्हणून धरली जाईल. गणसंख्येच्या अभावी सभा झाली नाही तर पुढे ढकललेल्या सभेस गणसंख्येची गरज राहणार नाहीं.

१४) सर्वसाधारण मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष किंवा त्यांच्या गैरहजेरींत शुपाध्यक्ष स्वीकारतील. अध्यक्ष किंवा शुपाध्यक्ष हे दोघेहि गैरहजर असल्यास सर्वसाधारण मंडळाची सभा आपल्यापैकींच अेका सभासदाला त्या सभे-पुरता अध्यक्ष म्हणून निवडील.

१५) सर्वसाधारण मंडळाच्या सभेत प्रत्येक सभासदाला प्रत्येकी अेकच मत देता येईल व सभेचे निर्णय साधारण बहुमताने घेण्यांत येतील.

१६) सर्वसाधारण मंडळाची वार्षिक सभा संस्थेच्या वर्षाच्या अखेर नंतर तीन महिन्याच्या अंत म्हणजे ३० जून पूर्वी बोलाविली जाईल. त्या सभेमध्ये साधा-रणतः पुढीलप्रमाणे कामकाज होईल.

(३) संस्थेच्या .......

(अ) संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक कामकाजाच्या अहवालाला मान्यता देणे.

आ) कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या व हिशोब तपासनीसाने तपासलेल्या संस्थेच्या वार्षिक हिशोबास मान्यता देणे.

इ) मुदत संपली असल्यास संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड करणे.

ई) मुदत संपली असल्यास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करणे.

उ) हिशोब तपासनीसांची निवड करणे.

ऊ) योग्य ती पूर्वसूचना देऊन सभेपुढे आणल्या जाणाऱ्या इतर विषयावर निर्णय घेणे.

ए) अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या इतर किरकोळ सूचनांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळ

१७) संस्थेची दैनंदिन व्यवस्था पाहण्यासाठी सर्वसाधारण मंडळाच्या वार्षिक सभेमध्ये दर तीन वर्षांनी कार्यकारी मंडळाची निवड केली जाईल.

१८) कार्यकारी मंडळामध्ये १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, २ संयुक्त कार्यवाह व १ खजिनदार असे पांच पदाधिकारी व ६ सभासद मिळून एकंदर अकरा सभासद असतील.

१९) संस्थेच्या सर्वसाधारण मंडळाच्या सभेत घेतलेले निर्णय अंमलात आणणे, संस्थेचे एकंदर कामकाज घटनेनुसार चालू ठेवणे व सामान्यतः संस्थेची सर्व व्यवस्था पाहाणे हे कार्यकारी मंडळाचे काम राहिल.

२०) कार्यकारी मंडळाची सभा अध्यक्षांच्या सल्ल्याने कार्यवाह बोलावतील. कार्यकारी मंडळाची सभा महिन्यांतून कमीत कमी एकदां तरी भरविण्यात येईल.

२१) कार्यकारी मंडळाच्या सभेपूर्वी कमीत कमी अठ्ठेचाळीस तास सभेचे आमंत्रण कार्यकारी मंडळाच्या सभासदांना कामकाजासह पोचले पाहिजे.

२२) खास तातडीची सभा चोवीस तासांच्या मुदतीने बोलाविता येईल.

२३) कार्यकारी मंडळाची सभा बोलाविण्यासाठी कार्यकारी मंडळाच्या चार सभासदांनी लेखी मागणी केल्यास अशी सभा संस्थेच्या कार्यवाहास आठ दिवसांचे आंत बोलवावी लागेल.

२४) कार्यकारी मंडळाच्या सभेसाठी पांच ही गणसंख्या (कोरम) राहिल. गणसंख्येच्या अभावी सभा झाली नाही तर पुढे ढकललेल्या सभेस गणसंख्येची गरज राहणार नाही.

२५) कार्यकारी ......

२५) कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान अध्यक्ष किंवा त्यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष स्वीकारतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष गैरहजर असल्यास कार्यकारी मंडळाची सभा अेका सभासदाला त्या सभेपुरता अध्यक्ष निवडील.

२६) कार्यकारी मंडळाच्या सभासदाला प्रत्येकी अेकमत देता येअील व सभेचे निर्णय साध्या बहुमताने घेण्यांत येतील.

२७) कार्यकारी मंडळांतील पदाधिकारी सोडून अितर सभासदांच्या जागा रिकाम्या झाल्यास त्या जागी नवीन सभासदांची नेमणूक करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहिल. करण्यांत आलेली अशी नेमणूक पुढील वार्षिक सभेपर्यंत मुक्त राहिल. पदाधिकाऱ्यांची जागा रिकामी झाल्यास मात्र नवीन पदाधिकाऱ्यांची निवड अेक महिन्याच्या आंत सर्वसाधारण मंडळाची खास सभा बोलावून त्या सभेकडून केली जाअील. त्या मुदतींत त्या पदाधिकाऱ्यांचे कामकाज कार्यकारी मंडळ पाहिल.

अध्यक्ष

२८) कार्यकारी मंडळाच्या आणि सर्वसाधारण मंडळाच्या सभेचे अध्यक्ष म्हणून काम चालविणे हे अध्यक्षांचे प्रमुख कार्य राहिल. सभेमध्ये समान मतविभागणी झाल्यास अध्यक्षाला आपल्या मताव्यतिरिक्त निर्णायक मत देण्याचा अधिकार राहिल. त्याचप्रमाणे संस्थेच्या अेकंदर कार्यावर देखरेख ठेवणे हे देखील अध्यक्षांचे काम राहिल.

उपाध्यक्ष

२९) अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे कामकाज पाहाणे आणि अितर वेळी सामान्यतः अध्यक्षांना त्यांच्या कामकाजांत मदत करणे हे उपाध्यक्षांचे काम राहिल.

३०) संयुक्त कार्यवाह

कार्यकारी मंडळाचा व सर्वसाधारण सभेचा कार्यक्रम तयार करून अध्यक्षांच्या सल्ल्याने सभा बोलावणे, कार्यकारी मंडळाने घेतलेले निर्णय अंमलांत आणणे, संस्थेच्या अेकंदर कागदपत्रांची जबाबदारी संभाळणे, संस्थेच्या वार्षिक कार्याचे अितिवृत्त तयार करणे व ते सर्वसाधारण मंडळाचे सभेस सादर करणे अित्यादि कामे संस्थेचे संयुक्त कार्यवाह पाहतील.

३१) खजिनदार

संस्थेच्या घटनेनुसार संस्थेका निधि संभाळणे, कार्यकारी मंडळाचे संमतीने

होणाऱ्या खर्चासाठी ......

होणाऱ्या खर्चासाठीं संस्थेच्या निधींतून रक्कम काढून देणें, संस्थेचा जमाखर्च ठेवणें, वार्षिक हिशेब व ताळेबंद तयार करून तो हिशेब तपासनिसांकडून तपासून घेणें आणि सर्वसाधारण मंडळाच्या सभेपुढे सादर करणें वगैरे कामें खजिनदार करतील.

३२) <u>हिशेब तपासनीस</u>

संस्थेचें जमाखर्चाचें वर्ष अेक अेप्रिल पासून अेकतीस मार्च पर्यंत राहिल. संस्थेचें सर्व हिशेब व जमाखर्च तपासण्यासाठीं सर्वसाधारण सभा संस्थेच्या वार्षिक सभेत अेक हिशेब तपासनीस नेमील. अशा हिशेब तपासनिसांचा अहवाल पुढील वर्षी सर्वसाधारण सभेत सादर करण्यांत येईल व त्यावर जरूर असल्यास योग्य ती चर्चा केली जाईल. अशा अहवालांत मांडलेल्या सूचना बहुमतानें अंमलांत आणल्या जातील.

३३) ही संस्था कांहीं अपरिहार्य कारणानें बंद करण्याचा निर्णय तीन चतुर्थांश बहुमतानें सर्वसाधारण सभेनें घेतल्यास कर्जे व अितर देणीं वजा जातां अुर्वरित रक्कम संस्थेच्या ध्येयाला पोषक कार्य करणाऱ्या सार्वजनिक संस्थेस सर्वसाधारण मंडळाच्या ठरावाप्रमाणें देण्यांत येईल.

३४) वरील घटनेंत फेरफार करण्याचा, अेखादा नियम वगळण्याचा किंवा नवीन नियम घालण्याचा आणि कुठल्याहि तऱ्हेनें दुरुस्ती करण्याचा अधिकार, योग्य ती पूर्व सूचना देऊन अुपस्थीत असलेल्यांपैकीं दोन तृतीयांश बहुमतानें घेतल्यास, सर्वसाधारण मंडळास राहिल.

---oo---

अध्यक्ष,
सन्मित्र मंडळ, गोरेगांव.